**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र**
**सकाळी 09 वाजून 20 मिनिटं**

**दिनांकः 02.10.2023** **वारः सोमवार**

---

**ठळक बातम्या**

- देशभरात एक तारीख, एक तास, एक साथ अभियानाला मोठा प्रतिसाद, पंतप्रधानांसह केंद्रीय मंत्र्यांचेही श्रमदान,
- तेलंगणसाठी राष्ट्रीय हळद मंडळ आणि सम्माक्का सारक्का आदिवासी विद्यापीठाची घोषणा
- येत्या 3 ते 4 वर्षांत जगातील आघाडीचं मोटार उत्पादन केंद्र बनण्याचं भारताचं उद्दिष्ट असल्याचं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचं प्रतिपादन आणि
- आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताची घौडदौड कायम, आज भारताच्या महिला कबड्डी संघाचा चीनबरोबर सामना.

---

**<u>मोदी स्वच्छता</u>**

देशभरात काल स्वच्छता सेवा अभियान विस्तृत स्वरूपात राबवण्यात आलं. पंतप्रधानांनी कुस्तीपटू अंकित बैयनपुरिया समवेत स्वतः स्वच्छता मोहिमेत सहभागी होत या मोहिमेचे नेतृत्व केलं. यावेळी अंकितशी संवाद साधत तंदुरूस्तीवर चर्चा केली त्यानंतर समाजमाध्यमांवर अंकित मवेतच्या संवादाची चित्रफित पंतप्रधानांनी सादर केली.

स्वच्छतेसाठी एक तारीख, एक तास एक साथ या पुढाकाराचा भाग म्हणून देशभरातल्या नागरिकांनी या मोहिमेत सहभाग घेतला. गेल्या महिन्याच्या मन की बात या पंतप्रधान मोदी यांच्या कार्यक्रमात त्यांनी स्वच्छता ही सेवा अभियानाचे महत्त्व विषय करत, कालच्या महामोहिमेमध्ये सहभागी होण्यासाठी आवाहन केले होते. देशभरात सर्व स्तरातल्या लोकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत, बाजारपेठा, रेल्वेस्थानकं, जलाशयं, पर्यटन स्थळं, प्रार्थनास्थळं आदींची स्वच्छता केली.

दिल्लीमध्ये भाजप अध्यक्ष जे.पी. नड्डा, केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव, धर्मेंद्र प्रधान, डॉ. जितेंद्र सिंग, हरदीप सिंग पुरी, मीनाक्षी लेखी, राजीव चंद्रशेखर आणि इतर नेत्यांनी स्वच्छता अभियानात सहभाग घेतला. या महामोहिमेअंतर्गत शहरी आणि ग्रामीण भागात मिळून सहा लाख 40 हजार जागांची श्रमदानासाठी निवड करण्यात आली होती. एक लाख निवासी परिसरांमध्ये कल्याणकारी संघटनांनी श्रमदानासाठी पुढाकार घेतला.

या उपक्रमात, भारतीय लष्कर, नौदल आणि वायु दलाचे कर्मचारी, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, केंद्रीय अन्वेषण विभाग आणि इतर विभागांनीही विविध स्थळांची स्वच्छता करण्यासाठी नागरिकांसोबत श्रमदान केलं.

**हळद मंडळ**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तेलंगण राज्यासाठी राष्ट्रीय हळद मंडळ आणि सम्माक्का सारक्का आदिवासी विद्यापीठाची घोषणा केली. महाबुबनगर मध्ये काल विविध विकास कामांचं उद्घाटन आणि लोकार्पण मोदी यांच्या हस्ते करण्यात आले त्यावेळी त्यांनी ही घोषणा केली. राष्ट्रीय हळद मंडळ सर्व हळद उत्पादक शेतकऱ्यांना हळद पिकासाठी सर्वतोपरी मदत करेल, असे त्यांनी सांगितले. तसेच आदिवासी विद्यापीठाला नऊशे कोटी रूपयांची मदतही त्यांनी जाहीर केली. राज्यात पायाभूत सुविधा आणि विकास प्रकल्पांमुळे रोजगार संधींमध्ये वाढ होईल आणि लोकांच्या जीवनमानात सुधारणा होईल, असं पंतप्रधान यावेळी म्हणाले.

अन्न प्रक्रिया मेगा पार्कचा संदर्भ देताना हा प्रकल्प विशेषतः हनुमकोंडा, वारंगल, खम्मम आणि महबूबनगर जिल्ह्यातल्या फायदेशीर ठरू शकते. पंतप्रधानांनी काल 13 हजार 500 कोटी रुपयांपेक्षा जास्त मूल्यांचे अनेक विकास प्रकल्पांचे लोकार्पण केले.

**संरक्षण**

वर्ष 2047 पर्यंत देशाला विकसित राष्ट्र बनवण्यासाठी भारताला आधुनिक उपकरणांसह बलशाली सशस्त्र दलांची गरज असल्याचं प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी काल केलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं हे स्वप्न साकार करण्यासाठी संरक्षण लेखा विभागाची भूमिका महत्वाची असल्याचं ते म्हणाले. संरक्षण लेखा विभागाला काल 276 वर्ष पूर्ण झाली त्या निमित्त आयोजित समारंभात काल नवी दिल्लीत सिंह बोलत होते.

**गडकरी**

येत्या 3 ते 4 वर्षांत जगातील आघाडीचं मोटार उत्पादन केंद्र बनण्याचं भारताचं उद्दिष्ट आहे, असं प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी काल चेक रिपब्लिकची राजधानी प्राग इथं, भारतीय समुदायाशी संवाद साधताना केलं. गेल्या नऊ वर्षांत ऑटोमोबाईल उद्योगाचा आकार साडेचार लाख कोटी रुपयांवरून साडेबारा लाख कोटी रुपयांपर्यंत वाढला असून या उद्योगामुळे देशातील साडेचार कोटी तरुणांना रोजगार मिळाला आहे असं यावेळी त्यांनी सांगितलं.

**जीएसटी**

2023-24 मध्ये चौथ्यांदा वस्तू सेवा कर संकलनाने एक कोटी 60 लाख कोटींचा टप्पा ओलांडला आहे. सप्टेंबर महिन्यामध्ये देशात एक लाख 62 हजार 7शे 12 कोटी रूपयांचा सकल वस्तू आणि सेवा

कर जमा झाला आहे. जमा जीएसटी मध्ये केंद्राचा वाटा हा 29 हजार 8 शे 18 कोटी रुपये तर राज्याचा वाटा 37 हजार 6 शे 57 कोटी रूपये आहे. एकात्मिक जीएसटीचा वाटा 83 हजार 6 शे 23 कोटी तर 11 हजार 6 शे 13 कोटी रुपये इतका उपकराचा वाटा आहे.

केंद्र सरकारने, सीजीएसटी ला 33 हजार 7 शे 36 कोटी तर एकात्मिक जीएसटी मधून राज्यांना 27 हजार 5शे 78 कोटी रूपये दिले आहे. त्यामुळे सप्टेंबर महिन्यामध्ये केंद्र आणि राज्य सरकारांचा एकंदर महसूल सीजीएसटी चा 63 हजार 555 कोटी आणि एसजीएसटी चा 65 हजार 235 कोटी आहे.

**हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण विविध भारतीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात. आपण या बातम्या न्यूज ऑन एआयआर या एपवरदेखील ऐकू शकता.**

**पंजाब-धानखरेदी**

पंजाबमध्ये, कालपासून धान खरेदीला सुरुवात झाली आहे. राज्य सरकारनं, वेगवेगळ्या मंडया यासाठी सज्ज केल्या असून भात गिरण्यामध्ये खरेदी केंद्र उभारण्यात आलेली नाहीत. तांदूळ कंत्राटदार तसंच गरजेनुसार तांदूळ प्रक्रिया करणाऱ्या गिरणी मालकांना त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या साठयाची माहिती देणं बंधनकारक करण्यात आलं आहे. पहिल्या दिवशी लुधियाना जिल्ह्यातल्या, आशियातील सर्वात मोठ्या खन्ना मंडई मध्ये, 20हजार क्विंटलहून अधिक धानाची खरेदी करण्यात आली.

**जितेंद्रसिंग सायन्स**

विज्ञान,तंत्रज्ञान आणि भारतीय भाषा यांचा सहसंबंध जोडण्याची गरज केंद्रीय मंत्री डॉक्टर जितेंद्र सिंग यांनी अधोरेखित केली. दिल्ली इथं आयोजित तंत्रज्ञान आणि भारतीय भाषा शिखर परिषदेत ते काल बोलत होते. इंग्रजीच्या भाषिक अडथळ्यामुळे शैक्षणिक क्षेत्रात इंग्रजी न येणारे मागे पडतात. स्थानिक भाषेचा केवळ प्रसार आणि प्रचार न करता व्यावहारिक उपयोगासाठी त्याला योग्य प्रोत्साहन देणे हाच त्यावर व्यावहारिक उपाय असल्याचे डॉक्टर सिंग यावेळी म्हणाले. विद्यार्थ्यांच्या मनातल्या आकांक्षा पूर्ण करून त्यांना उत्तम कारकीर्द घडवण्यासाठी शैक्षणिक धोरणबदल निश्चित उपयोगी पडेल. स्वदेशी लसी आणि चांद्रयान मोहिम देशाने आरोग्यसेवा आणि तंत्रज्ञान या क्षेत्रात घेतलेली झेप दर्शवते असे सांगून बदल हळहळू टप्प्याटप्प्याने होतात.

2047 मध्ये देश स्वातंत्र्याच्या शतकमहोत्सवासह या सर्व कष्टांचे फळही साजरे करेल अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

**लष्करी परिचर्या सेवा**

लष्करी सुश्रुषा सेवेचा अठठ्याणवा स्थापना दिवस काल साजरा करण्यात आला. सशस्त्र दलांमधील संपूर्णपणे महिलांचा समावेश असलेली ही सर्वात जुनी आणि अद्वितीय सेवा आहे. भारतीय

सैनिक ब्रिटीश सैन्यामध्ये कार्यरत असतानाच्या काळात स्थापन झालेल्या या सेवेने पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धात जखमी झालेल्या सैनिकांवर उपचार करण्यात महत्वाची भूमिका बजावली. या निमित्तानं सेवेतील आणि सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी काल राष्ट्रीय युद्ध स्मारकाला भेट देऊन आदरांजली वाहिली.

**<u>गांधीजयंती</u>**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची आज 154 वी जयंती आहे. आणि माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांचीही आज 119  जयंती आहे. यानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. महात्मा गांधींच्या सत्य आणि अहिंसेच्या आदर्शांनी जगाला एक नवीन मार्ग दाखवला, असं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.  राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजघाटावर राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना आणि विजय घाटावर जाऊन लालबहादूर शास्त्री यांना श्रद्धांजली वाहिली. तत्पुर्वी, महात्मा गांधींची कालातीत शिकवण आपला मार्ग उजळत राहाते, तर आव्हानात्मक काळात शास्त्रीजींचे नेतृत्व अनुकरणीय असल्याचे मोदींनी समाज माध्यमांवर दिलेल्या श्रद्धांजली संदेशात म्हटलं आहे.

**<u>आशियाई क्रीडा</u>**

19 व्या आशियाई क्रीडा स्पर्धांमध्ये भारताच्या खात्यातल्या पदकांची संख्या 13 सुवर्ण, 21 रजत आणि 21 कास्य पदकांसह 55 वर पोचली आहे.

19 व्या आशियाई क्रीडा स्पर्धांमध्ये आज नवव्या दिवशी  पुरुषांच्या स्पीड स्केटिंग तीन हजार मीटर रिले शर्यतीत आणि रोलर स्केटिंग मध्ये भारतानं 2 कास्यपदक जिंकलं.

आज भारताच्या महिला कबड्डी संघाचा सामना चीन शी होणार आहे. टेबल टेनिस मध्ये महिला दुहेरीत उपांत्य फेरीत सुतीर्थ मुखर्जी आणि अहिका मुखर्जी यांचा सामना उत्तर कोरियाच्या खेळाडूंशी होईल. अमलान बोरगोहेन, पुरुषांच्या 200 मीटरमध्ये आणि भारतीय मिश्रित 4x400 मीटर स्पर्धेत धावणार आहे. तर भारतीय पुरूष संघाचा अ गटातला अंतिम सामना बांग्लादेशशी होणार आहे.

स्पर्धेच्या कालच्या दिवसात भारतीय क्रीडापटूंनी 15 पदकांचा पाऊस पाडला. ॲथलेटिक्समध्ये विक्रमाच्या नोंदीसह काल दोन सुवर्ण पदकं मिळवली.

त्यामध्ये महाराष्ट्रातल्या अविनाश साबळेनं तीन हजार मीट स्टीपलचेस प्रकारात 8 मिनिटं साडे एकोणीस सेकंदाचा विक्रम नोंदवत सुवर्णपदकाला गवसणी घातली. महिलांच्या वैयक्तिक गोल्फ प्रकारात, आदिती अशोक देशासाठी रौप्य पदक मिळवणारी पहिली भारतीय महिला ठरली. भारतीय नेमबाजांनीही काल सर्वोत्तम कामगिरीची नोंद केली.

तर मुष्टियुद्धातल्या निखट झरीन ला 50 लो श्रेणीमध्ये उपांत्यफेरीची लढत गमावल्याने कास्य पदकावर तर भारतीय पुरूष बॅडमिंटन संघाला चीनकडून पराभव स्वीकारत रौप्य पदकावर समाधान मानावं लागलं.

**अनुरागअविनाश**

दरम्यान, आशियाई क्रीडा स्पर्धेत विक्रम नोंदवणाऱ्या अविनाश साबळे याचे युवा आणि क्रीडा मंत्री अनुरागसिंग ठाकूर यांनी अभिनंदन केले आहे. समाज माध्यमांवर लिहिलेल्या आपल्या प्रतिक्रियेत त्यांनी अविनाशच्या दृढनिश्चय आणि कौशल्याचे कौतुक केले आहे. शेवटच्या लॅप मध्ये केलेल्या उल्लेखनीय पराक्रमाचा उल्लेख करत अविनाशचा विजय हा त्याच्या मेहनत आणि जिद्दीचा पुरावा असल्याचे म्हटले आहे.

---

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**